N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): जालना    **P.S.**(ठाणे): कदीम -जालना    **Year** (वर्ष): 2019

   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0022    **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 16/01/2019 23:22 बजे

2. | S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
   |---|---|---|
   | 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारीत 2018) | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
   1. **Day**(दिवस): बुधवार    **Date From** (दिनांक पासून): 16/01/2019
   
      **Time Period** (कालावधी): पहर 5    **Date To** ( दिनांक पर्यंत): 16/01/2019
      
      **Time From** (वेळेपासून): 15:08 बजे
      
      **Time To** (वेळेपर्यंत): 15:08 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

   **Date** (दिनांक ): 16/01/2019    **Time** (वेळ): 22:00 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

   **Entry No.** (नोंद 038    **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 16/01/2019 23:12 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

   1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 0.5 किमी

   **Beat No.** (बिट क्र.):

   (b) **Address** (पत्ता): महाराष्ट्र जिवन प्राधिकरण,कार्यालय जालना

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

   **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

   (a) **Name** (नाव): अजिनाथ विठ्ठल काशिद

   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

   (c) **Date/Year of Birth** (जन्म 1967    (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.):    **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

   **Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

   | S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
   |---|---|---|
   | 1 | | |

   (h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालन,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालन,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9823142632

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर | | | 1. उप अभियंता,जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभ,उप विभाग, परतुर,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम अ.पा.लागलेली व एक जुनी वापरती जिन्स पन्ट | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

यावेळी गु.र.नं. 22/2019 कलम क.7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधि नियम 1988(भ्र.संशोधन अधि.2018) प्रमाणे गुन्हा दाखल.फिर्यादी :- अजिनाथ विठ्ठल काशिद, वय 52 वर्ष पोलीस निरीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना. मो.नंबर 9823142632.आरोपी :- आलोसे श्री.विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, वय 50 वर्षे उप अभियंता, जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग, उप विभाग, परतुर जि.जालना रा. सिडको, एन-8, घर नं.3 विश्वकर्मा सोसायटी, जि.औरंगाबादखाते :- पाणी पुरवठा , वर्ग - 2 गु.घ.ता.वेळ ठिकाण :- दि. 16.01.2019 रोजी 15:08 वाजतामहाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालय जालना येथे.जप्त माल :- 1) 3000/- रुपये लाचेची रक्कम अ.पा.लागलेली 2) एक जुनी वापरती जिन्स पन्ट खुलासा :- वर नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी मुळ तक्रारदार परमेश्वर बाबुराव कदम, यांचे शेत जमीनीमध्ये महात्मा गांधी रोजगार योजने अंतर्गत खोदलेल्या विहरीची नोंद 7/12 वर घेण्यासाठी लागणारे पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर सही करुन देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे 3000/- रुपये लाचेची मागणी केली. दि.16.01.2019 रोजी पंच साक्षीदार यांच्या समक्ष 3000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल करुन तपास विनोद.ल.चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,जालना यांचेकडे दिला. सरकारतर्फे फिर्याद दिनांक 16.01.2019. मी आजिनाथ विठ्ठल काशीद, वय 52 वर्ष पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना. मो.नं.9823142632. सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे पोलीस निरीक्षक पदावर दिनांक 03.06.2016 पासून कार्यरत आहे. दिनांक 16.01.2019 रोजी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना कार्यालयात हजर असतांना मुळ तक्रारदार परमेश्वर बाबुराव कदम, वय 24 वर्ष, व्यवसाय शेती, रा.आनंदवाडी, ता.परतुर, जि. जालना यांनी तक्रार दिली की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती करुन आई वडीलासह राहतो. माझी मौजे आनंदवाडी शिवारात गट नंबर 152 मध्ये 1 हेक्टर 20 आर शेती असुन त्यामध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर खोदली असुन विहीरीचे खोदकाम पुर्ण झाल्याने शासनाकडुन अनुदान तीन लाख प्राप्त झाले आहे. सदरील विहीर खोद कामाची 7/12 वर नोंद घेणे असलेने आमचे गावचे तलाठी यांना भेटलो असता त्यांनी विहीर खोद काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणेबाबत सांगीतले. मी पुर्णत्वाचे प्रमाणपत्र भरुन त्यावर आमचे गावचे ग्राम रोजगार सेवक, ग्रामसेवक व सर्च इर्जिनियर यांची सही घेवुन उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. उप विभाग परतुर श्री.फुलंब्रीकर यांची दि. 07.01.2019 रोजी भेट घेवुन प्रमाण पत्रावर सही करण्याची विनंती केली असता त्यासाठी त्यांनी 2000/- रुपयाची मागणी केली. माझ्या गावचे रामकिसन भिमराव भापकर व अंगट बापुराव मातने यांनी पण त्यांच्या विहीरी पुर्ण केल्या असुन त्यांनी पण प्रमाणपत्रावर सही करण्यासाठी माझ्याकडे दिले आहे. आज सकाळी मी पुन्हा आम्हा तिघांचे प्रमाण पत्र घेवुन उप अभियंता श्री.फुलंब्रीकर साहेब यांची जालना महाराष्ट्र जीवन

प्राधीकरणच्या कार्यालयात भेट घेतली असता त्यांनी प्रत्येकी 2000/- रुपये प्रमाणे 6000/- रुपये दिल्याशिवाय प्रमाणपत्रावर सही करणार नाही असे सांगीतले. त्यावर मी त्यांना नाईलाजास्तव हो असे म्हणालो. उप अभियंता श्री.फुलंब्रीकर यांनी मला माझे मौजे आनंदवाडी शिवारात गट नंबर 152 मध्ये 1 हेक्टर 20 आर शेतात महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर खोदल्याचे पुर्णत्वाचे प्रमाण पत्रावर सही करण्यासाठी आज रोजी जालना महाराष्ट्र जीवन प्राधीकरणच्या कार्यालयात बोलाविले आहे. माझी उप अभियंता श्री.फुलंब्रीकर यांना लाच द्यायची इच्छा नाही परंतु मी लाच दिली नाही तर ते मला महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर खोदल्याचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर सही देणार नाहीत. माझी उप अभियंता श्री.फुलंब्रीकरे यांचेसोबत कोणतीही दुश्मनी किंवा आर्थीक देण्या घेण्याचा व्यवहार नाही. मी आज दिनांक 16.01.2019 रोजी आमचे विभागाचे इंजिनीअर श्री.फुलंब्रीकर यांना पंचायत समिती जालना समोरील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप विभाग जालना येथे भेटुन त्यांना माझे मौजे आनंदवाडी शिवारातील गट नंबर 152 मध्ये 1 हेक्टर 20 आर शेतात महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर खोदल्याचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर सही करण्यासाठी विनंती करणार आहे. त्यावेळी इंजिनियर श्री.फुलंब्रीकर यांनी मला लाचेची मागणी करुन स्वत: अगर इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कार्यवाही करावी.वगैरे मजकुराची तक्रार दिली.त्यावरुन सदर प्रकरणा मध्ये दिनांक.16.01.2019 रोजी तक्रारदार श्री.परमेश्वर कदम यांचे तक्रारीवरुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप विभाग जालना येथे जावुन आलोसे श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, वय 50 वर्ष, उप अभियंता जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जालना अतंर्गत उप विभाग परतुर यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी पंचासमक्ष व व्हाईस रेकर्डर च्या सहाय्याने करण्यात आली. पडताळणी दरम्यान पंचा समक्ष आलोसे श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, उप अभियंता, यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मौजे आनंदवाडी शिवारातील गट नंबर 152 मध्ये 1 हेक्टर 20 आर शेतात महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर खोदल्याचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर सही करण्यासाठी 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन 3000/- रुपयाची लाच स्विकारण्यास तयार झाल्याचे निष्पन्न झाले. सदर बाबत सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा दिनांक 16.01.2019 रोजी करण्यात आला. त्यानंतर दिनांक 16.01.2019 रोजी लाच मागणी पडताळणी व सापळापुर्व पंचनामा संपल्यानंतर मोटार सायकलने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप विभाग जालना येथे पोहचुन श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, उप अभियंता यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार परमेश्वर कदम व पंच क्र.1 श्री.मुत्याल यांना व्हाईस रेकर्डर सह रवाना केले. सदर ठिकाणी लाचेचा सापळा लावला असता आलोसे श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, उप अभियंता यांनी तक्रारदार यांचे वरील नमुद कामासाठी पंचा समक्ष तक्रारदार यांचेकडुन 3000/- रुपयाची लाच 15.08 वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप विभाग जालना येथील ते बसलेल्या कक्षात स्विकारली असतांना आलोसे श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, उप अभियंता यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले.घटनास्थळी केलेल्या कार्यवाही मध्ये श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, उप अभियंता यांचे उजव्या हाताचे बोटाचे पेऱ्यावर व तळव्यावर तसेच लाचेच्या नोटांवर, तसेच त्यांच्या अंगातील पन्टच्या उजव्या बाजुच्या साईडचे खिशाचे आतील बाजुस व तोंडावर अ.पा.चे गुणधर्म आढळून आले. श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, उप अभियंता यांचे ताब्यातुन लाचेची रक्कम 3,000/- रुपये हस्तगत करण्यात आली. तसेच श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, उप अभियंता यांचे अंगातील अ.पा. लागलेली जिन्सची पन्ट जप्त करण्यात आली. याबाबतचा सविस्तर घटनास्थळ पंचनामा दिनांक 16.01.2019 रोजी करण्यात आला. आरोपी लोकसेवक श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, वय 50 वर्ष, उप अभियंता जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जालना अतंर्गत उप विभाग परतुर रा.सिडको, एन-8, घर नं.3 विश्वकर्मा सोसायटी, जि.औरंगाबाद यांनी त्यांना मिळणारे कायदेशीर परिश्रमीका खेरीज पारितोषण अथवा दान म्हणून पडताळणी दरम्यान 3000/- रूपये लाचेची मागणी करुन 3000/- रुपयाची लाच स्विकारून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेतला आहे. म्हणून माझी आरोपी लोकसेवक श्री. विजयेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, वय 50 वर्ष, उप अभियंता जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जालना अतंर्गत उप विभाग परतुर रा.सिडको, एन-8, घर नं.3 विश्वकर्मा सोसायटी, जि.औरंगाबाद यांचे विरूद्ध कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारीत - अधिनियम 2018) अन्वये सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

( आ.वि.काशीद ) पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे Vinod Laxuman **Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबरे देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Sanjay Mahadev Lohakare
**Rank**(पद): (Inspector)
**No.**(सं.): pi

पोलीस ठाणे अंमलदार
पो. स्टे. कदिम जालना